

निर्भीड • निरपेक्ष

RNI MAHMAR/2024/89502

# दैनिक प्रजाशाहीचा आवाज

वर्ष 03 रे | अंक 60 वा | सोनवार 14 सप्टेंबर 2026 | मुख्य संपादक वैभव एस. धबडगे



गणपती बाप्पा मोरया...
मंगलमूर्ती मोरया...
गणेशोत्सवाच्या सर्व गणेशभक्तांना हार्दिक शुभेच्छा!


# रामतीर्थ परिसरात मुरुम माफीया जोमात

# महसूल विभाग कोमात

## महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून उत्खनन मुरुम माफियांना रान मोकळे आशीर्वाद कोनाचा?

### उत्खननाच्या नाबाखाली १००० ब्रास उत्खनन

### महसूल प्रशासनाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा जनतेचा आरोप



**पर्यावरणाचा बळी ! कोण जबाबदार ?**

■ **बिलोली प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील रामतीर्थ परिसरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या मुरुम उत्खननामुळे स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हजारो ब्रास मुरूम उत्खनन नवोदय शाळेच्या पाठीमागुन होत आहे परिसरातील शेतजमिनी, रस्ते आणि पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचा नागरिकांचा दावा आहे.

उत्खननासाठी वापरली जाणारी मोठ्या क्षमतेची यंत्रसामग्री आणि हायवा टिपर दिवस-रात्र सुरू असलेली वाहतूक यामुळे परिसरात अवैध उत्खनन चालत असल्याची चर्चा रंमु लागली आहे. रामतीर्थ परिसरात नोवदय शाळा, बेंक, व्यवसाय करनारे विविध रामतीर्थ परिसरात दळणवळण मोठ्या प्रमाणात होत आसतो

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विभागांकडून कोणतीही कारवाई न होता उत्खनन सुरूच आहे. काही नागरिकांनी तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसील कार्यालयाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला असून यामागे "हम्यांचे व्यवहार" सुरू असल्याचा संशयही व्यक्त केला आहे. मात्र प्रशासनाकडून या आरोपांवर अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

दरम्यान, राव्यात अलीकडेच आयएएस अधिकान्यांशी संबंधित एक प्रकरण चर्चत असताना, त्याच धर्तीवर बिलोली तालुक्यातील हा उत्खननाचा मुदा अधिक गंभीर ठरत असल्यांचे नागरिकांचे मत आहे. तसेच, या कार्यवत्नीवर वरिष्ठ पातळीवरून दडपण आणले जात असल्वलही काहींच्या तक्रारी आहेत. हे सर्व दावे स्थानिकांच्या म्हणण्यावर आधारित अशुन् प्रशासनाकडून याची स्वतंत्र चौकशी अपेक्षित आहे.

स्थानिक ग्रामस्यांनी या उत्खननाची तत्काळ चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यांची मागणी जनतेमधून होत आहे . त्यांनी पर्यावरणीय नुकसान, रस्त्यांची नासधूस आणि सार्बजनिक सुरक्षेचा प्रश्न उपप्यित केला आहे.

प्रशासनाकडून तातडीने पंचनामा करून उत्खनन परवान्यांची पडताळणी, वाहनांची तपासणी आणि उत्खननाचा व्याम यावाबत चौकशी व्हावी, अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

### स्थानिकांची प्रतिक्रिया

❝ नवोदय शाळेच्या पाठीमागे इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत आहे. यामुळे आमच्या शेतीची नासधूस होत आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी.

— स्थानिक नागरिक

❝ दिवस-रात्र हायवा टिपरची वाहतूक सुरू असते. कोणालाही भीती नाही. यामागे नक्कीच मोटी सेटिंग आहे.

— स्थानिक शेतकरी

❝ तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसील कार्यालयाकडून दुर्लक्ष होत आहे. आमच्याकडे कुणीही लक्ष देत नाही.

— गामस्थ



हायवा टिपरची दिवस-रात्र वाहतूक



रामतीर्थ परिसरातील उत्खनन



नवोदय शाळेच्या पाठीमागे उत्खनन


ॐ गणपती बाप्पा मोरया...
या गणेशोत्सवात
सुख, समृद्धी आणि न्याय मिळो !

जनतेचा आवाज • सत्याचा ध्यास • लोकशाहीचा प्रहरी

दैनिक प्रजाशाहीचा आवाज

• निर्भीड • निष्पक्ष • निर्भय

सत्यासाठी सदेव तत्पर

वर्ष : ०३ | अंक : ६० | रविवार, १३ सप्टेंबर २०२६ | पाने : ८ | किंमत : ₹ २.०० | RNI : MAHMAR/2024/89502

# होनवडज येथे भारतीय बौद्ध महासभेच्या ग्राम शाखेची उत्साहात स्थापना; अध्यक्षाप्दी होन्वडजकर यांची निवड

**(प्रतिनिधी): केतन बेंदेकर**

तालुक्यातील होनवडज येथे १० सप्टेंबर २०२६ रोजी 'भारतीय बौद्ध महासभा' ग्राम शाखेची अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात स्थापना करण्यात आली. या प्रसंगी गावातील बौद्ध उपासक व उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक त्रिशरण आणि पंचशील ग्रहण केले. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष अविनाश कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संस्थेचे नियम, आचासंहिता आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांचे महत्व विशद केले. यासोबतच तालुका सरचिटणीस कुलदीप बनसोडे, कोषाध्यक्ष अ‍ॅड. मिलिंद कांबळे पी. एस. कांबळे सर यांनी उपस्थितांना मातृसंस्थेचे ध्येय-धोरण आणि कार्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

**नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:**

**अध्यक्ष:** प्रकाश होनवडजकर
**संस्कार उपाध्यक्ष:** दिलीप होनवडजकर
**पर्यटन उपाध्यक्ष:** कुणाल कांबळे (सरपंच प्र.)
**संरक्षण उपाध्यक्ष:** सचिन कांबळे
**सरचिटणीस:** जयवंत कांबळे
**कोषाध्यक्ष:** दत्तात्रय कांबळे
**तपासणीस:** प्रदीप कांबळे
**सचिव:** सोपान कांबळे, हिम्मत कांबळे, प्रेमराज कांबळे
**संघटक:** संभाजी कांबळे, उत्तम कांबळे, गौतम कांबळे, हनुमंत कांबळे
**सहसंघटक:** कबीरदास कांबळे, वसंत कांबळे, नरसिंग कांबळे, रत्नदीप कांबळे



**प्रतिमा:** होनवडज येथील 'भारतीय बौद्ध महासभा' ग्राम शाखेच्या स्थापना समारंभाप्रसंगी नवनियुक्त अध्यक्ष प्रकाश होनवडजकर व इतर पदाधिकारी (डॉ. आंबेडकर पुतळ्यासमोर)

यासोबतच कार्यकारिणीवर इतरही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचलन तालुकाध्यक्ष अविनाश कांबळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार क्षालुका ज्ञनामणा कुरमक्षव आभार तालुका सरचिटणीस कुलदीप बनसोडे व कोषाध्यक्ष अ‍ॅड.ड. मिलिंद कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमास गावातील बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवनिर्वाचित कार्यकारिणीन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.